Exh.1/ B

डेली नोंद नं.        /२०२५

अर्ज दाखल तारीख -        /१०/२०२५

किरकोळ फौज. अर्ज नं. [ ] /२०२५

## कोल्हापुर येथील मे. जिल्हा न्यायाधिशसाो, यांचे कोर्टात...

| | |
|---|---|
| १) **श्री. अरूण राजाराम मोरे**<br>व.व. ३४, व्यवसाय- नोकरी ,<br>रा. प्लॉट नं. २१, जनता बँक<br>कॉलनी, शामरावनगर, सांगली,<br>ता. मिरज, जि. सांगली. | **अर्जदार** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) **सौ. सुप्रिया अरूण मोरे**<br>व.व. २६, व्यवसाय- घरकाम,<br>रा. द्वारा- भगवान आदाप्पा नाईक<br>रामलक्ष्मण नगर, संभाजीपुर,<br>ता. शिरोळ, जि. कोल्हापुर. | **जाबदार** |

Order
Issue notice to Opponent.

B.N.S.S. 2023 कलम 448
**प्रमाणे अर्ज.**

S.J. Kop
24/11/2025

**यात अर्जदार मे. कोर्टास कळवितात ते खालीलप्रमाणे,**

१) यातील जाबदार यांनी जयसिंगपुर येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाो, जयसिंगपुर यांचे कोर्टात पी.डब्ल्यु.डी.व्ही.ए.नं. २३/२०२१ ही केस महिलांचे घरगुती हिंसाचारापासून सरंक्षण कायद्याअंतर्गत

दाखल केलेली आहे. सदरचे प्रकरण हे सध्या मे. दुसरे सह दिवाणी न्यायाधिश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, जयसिंगपुर व्ही. एम. कोळेकर यांचे कोर्टात प्रलंबित आहे. सध्या सदरकामी यातील अर्जदार यांनी जाबदार यांच्या विरूध्द भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम ३७९ अन्वये नि. ३२ खाली दाखल केलेला आहे. यातील जाबदार यांनी सदरकामी कोणतेही काम करत नसलेबाबत खोटे ॲफिडेव्हीट दाखल केले आहे. त्यानुसार जाबदार यांच्यावर फौजदारी कारवाई व्हावी यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज हा सध्या प्रलंबित आहे.

२) यातील अर्जदार यांचे माहितगार वकिल ॲड. जे. ए. जमादार, सांगली व ॲड. आय. ए. पेंढारी हे सांगली जिल्हा बार असोसिएशन चे सदस्य आहेत. प्रस्तुत अर्जदार व जाबदार यांचे प्रकरण पी.डब्ल्यु.डी.व्ही.ए.नं. २३/२०२१ हे वरील नमुद पिठासीन अधिकारी यांचे समोर प्रलंबित आहे ते देखील सांगली जिल्हा न्यायालय, सांगली येथे वकिली व्यवसाय करीत होते. सदर कामातील पिठासीन अधिकारी हे सांगली जिल्हा बार असोसिएशनचे सदस्य होते. त्यामुळे सदरचे प्रकरणामध्ये यातील अर्जदार यांना जयसिंगपुर येथील दुसरे कोर्टात सदरचे प्रकरण वर्ग करुन मिळविणे उचित होईल यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

KAVITA BIPIN AGRAWAL
Digitally signed by KAVITA BIPIN AGRAWAL
Date: 2025.11.27 18:02:32 +0530

३) सदरकामी यातील अर्जदार यांचे वकिलांनी नि. ३२ खालील अर्जावर युक्तीवाद केलेला आहे. यातील अर्जदार यांचे वकिल हे सांगली बारचे सदस्य असल्याने अर्जदार यांना साधार भिती आहे की, सध्या प्रलंबित असलेल्या कोर्टात अर्जदार यांना न्याय मिळणार नाही. यातील अर्जदार यांच्या बाजुने निकाल झाल्यास मा. पिठासीन अधिकारी यांचेवर दोषारोप

होणेची दाट शक्यता सदरकामी आहे. यातील अर्जदार यांचेवर सदर कामातील जाबदार यांनी अन्याय केलेला आहे. यातील जाबदार हे मे. कोर्टाची फसवणुक करून पोटगीचा आदेश घेण्याच्या प्रयत्नात आहे, ही बाब यातील अर्जदार यांनी नि. ३२ च्या अर्जासोबत मे. कोर्टाच्या निर्दशनास आणलेली आहे. यातील अर्जदार हे वर्ग केलेल्या कोर्टासमोर सदरचे प्रकरण लवकरात लवकर चालविणेस तयार आहेत. यातील अर्जदार यांचे अर्ज नामंजूर झालेस अर्जदार यांचे प्रचंड नुकसान होणार आहे. यातील अर्जदार यांना न्यायापासून वंचित रहावे लागणार आहे. प्रस्तुत अर्जदार यांना नाईलाजास्तव सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

४) **अर्जास कारण** - सदर अर्जातील मुळ पी.डब्ल्यु.डी.व्ही.ए.नं. २३/२०२१ ही केस जयसिंगपुर येथील मे. दुसरे सह दिवाणी न्यायाधिश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाो, जयसिंगपुर व्ही. एम. कोळेकर यांचे कोर्टात प्रलंबित असल्याने सदर अर्जदार यांचे माहितगार वकिल देखील मे. पिठासीन अधिकारी हे वकिली करीत असलेल्या सांगली बार असोसिएशनचे सदस्य आहेत. त्यामुळे यातील अर्जदार यांना न्याय मिळणार नसल्याची साधार भिती आहे व तसेच अर्जदार यांच्या बाजुने कोणताही निकाल झाल्यास मे. पिठासीन अधिकारी यांचे विरूध्द दोषारोप होण्याची शक्यता असल्याने सदरचे अर्जास कारण घडले आहे व रोज घडत आहे.

५) **अधिकारक्षेत्र** - मुळ केस पी.डब्ल्यु.डी.व्ही.ए.नं. २३/२०२१ ही या मे. कोर्टाच्या अधिकारक्षेत्रातील तालुका न्यायालयात प्रलंबित असल्याने सदरचा अर्ज चालविणेच्या अधिकार या मे. कोर्टास आहे.

६) **कोर्ट फी** - सदर अर्जास योग्य ती कोर्ट फी जोडलेली आहे.

(७) **<u>तरी अर्जदार यांची विनंती की,</u>**

अ) अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेत यावा.

ब) जाबदार यांनी दाखल केलेले पी.डब्ल्यु.डी.व्ही.ए.नं. २३/२०२१ हे प्रकरण जयसिंगपुर येथील इतर कोणत्याही तत्सम पिठासीन अधिकारी यांचे कोर्टात वर्ग करणेबाबत आदेश व्हावा.

क) इतर योग्य ते न्यायाचे आदेश अर्जदार यांचे वतीने व्हावे.

ड) जरूर तर अर्ज दुरूस्तीस करणेस परवानगी असावी.

येणेप्रमाणे अर्ज असे.

ठिकाण - कोल्हापुर

दिनांक - 10 /१०/२०२५

----------------------
**श्री. अरूण राजाराम मोरे**

**<u>व्हेरिफिकेशन</u>**

यात मी **श्री. अरूण राजाराम मोरे,** व.व. ३४, व्यवसाय- ~~नोकरी~~, रा. प्लॉट नं. २१, जनता बँक कॉलनी, शामरावनगर, सांगली, ता. मिरज, जि. सांगली सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जामधील संपूर्ण मजकुर माझे माहिती व समजुतीनुसार खरा व बरोबर आहे.

येणेप्रमाणे व्हेरिफिकेशन असे.

ठिकाण - कोल्हापुर

दिनांक - 10 /१०/२०२५

----------------------
**श्री. अरूण राजाराम मोरे**

Adv. I. A. Pendhari